MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Issue-18, Vol-03, April to June 2017

# Vidyawarta®

## International Multilingual Research Journal



Editor
Dr.Bapu G. Gholap

www.vidyawarta.com

Sonpeth Pin-431516 Dist.Parbhani ... Arts College

## || Index ||

1) School Culture, Hidden Curriculum & Socialization
Abhilasha Bajaj, Bawana Delhi || 09

2) DEMONETIZATION AND ITS EFFECT ON INDIAN ECONOMY
Dr. Neeraj Kumar Gupta, Chinhat, Lucknow || 13

3) A comparative Study of Soft drink & Fruit juices
Pinki kumawat-Dr. Rajeshri Desai, Indore || 17

4) The film Genre of Horror: Impact on Human
Warad Manisha || 23

5) A Critical Examination of the Teaching Methods Practiced by the Teachers of Botany......
Garima Verma-M. Varma, Lucknow || 26

6) WOMEN EMPOWERMENT THROUGH ENTERPRENEURSHIP INITIATIVES IN HARYANA: SWOT ANALYSIS
Sawitri Devi, Gurgaon (Haryana) || 31

7) SELECTING MALE PARTNER: EVIDENCE FROM CONJOINT ANALYSIS
RASHMI, Rohtak (Haryana) || 41

8) Convergence of Indian Accounting standards with International Accounting Standards & Practices:..
Devershetty Rajitha, Kamareddy, Telangana || 48

9) Impact of Demonetization on Real Estate
Dr. S. R. Raghuwanshi, Amravati || 54

10) DETECTION OF BRAIN TUMOUR & DETERMINATION OF ITS LOCATION & AREA USING MATLAB
Mayuri Pote-Anjali Mool-Nahid Sheikh, Umrer || 57

11) Diamond Industry Workers And Recession: A Socio Economic Outlook
Jigna Patel, || 60

12) LAKSA (लाक्षा): A PRIMARY STUDY ON AN INDIGENOUS MEDICINAL PLANT
Dr. Harekrushna Mishra, || 66

13) मराठी नाटक आणि मराठी अभिनेत्यांची आत्मकथने
प्रा. डॉ. बागूल एम. एम., ओतूर, ता. जुन्नर, जि. पुणे || 69

https://sites.google.com/site/vidyawartajournal http://www.vidyawarta.blogspot.com

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta. Sonpeth Dist. Parbhani



14) नाटकातील व्यक्तिचित्रण व स्वभावरेखाटन
डॉ. संदीप अ. बनसोडे, औरंगाबाद. || 72

15) संत तुकारामांच्या अंधश्रध्देवर प्रहार
प्रा.डॉ.वैशाली भालसिंग, पारनेर || 75

16) खामगांवतील विविध संस्थांचे स्वातंत्र्य चळवळीतील कार्य
प्रा. एस. पी. चव्हाण, बाळापूर, अकोला. || 81

17) अस्पृश्यांच्या स्वाभिमानी चळवळीचा मृत्यूलेख—पुणे करार
प्रा. डॉ. प्रदिप शा. ढोले, वरुड, ता. वरुड. जि. अमरावती || 86

18) भाषा व समाज
प्रा. डॉ. ज्ञानेश्वर सखाराम गवळीकर, सिल्लोड, जि. औरंगाबाद || 89

19) तमाशा कलावंतांच्या संघर्षशील जीवनाचा वेध घेणारी कादंबरी:चंद्रमुखी
प्रा.यशवंत आश्रुवा हाके, वदनापूर, ता.वदनापूर, जि.जालना. || 93

20) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना : विशेष संदर्भ बीड जिल्हा
प्रा. जोशी राजकुमार लक्ष्मीकांत- प्रा. डॉ. महेश प्रभाकर देशमुख ||97

21) नाट्यसंहिता आणि रंगमंचीय आविष्कार
प्रा.डॉ.विजय विष्णुपंत केसकर, कळंब वालचंदनगर || 100

22) पंचायत राज आणि महिला सक्षमीकरण
प्रा. पी. एस. खोपे, कुरखेडा || 102

23) अन्न सुरक्षा व भारतीय शेतीवरील परिणाम
प्रा. डॉ. राजेंद्र एन.बोरसे, लोणार जि.बुलढाणा || 106

24) दारिद्र्य निर्मूलनात प्रशासनाची भूमिका
प्रा.डॉ.सोमवंशी मुक्ता (गंगणे), सोनपेठ जि.परभणी || 108

25) स्त्री शिक्षणाचा ऐतिहासिक आढावा
रविंद्र पाटील || 112

26) बहिणाबाई चौधरींच्या काव्यातील अध्यात्म व मानवता
प्रा. दिनेश हिंमतराव पाटील, भालोद, ता. यावल, जि. जळगांव || 116

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Sonpeth Dist.Parbhani



24

# दारिद्र्य निर्मूलनात प्रशासनाची भूमिका

**प्रा.डॉ.सोमवंशी मुक्ता (गंगणे)**
लोकप्रशासन विभाग प्रमुख
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ जि.परभणी

***********

**प्रस्तावना :**

२१ व्या शतकाच्या सुरूवातीला भारतासह जगातील अनेक देशांनी सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने काही ध्येय निश्चित केली. त्यापैकी महत्वाची म्हणजे गरिबी आणि भूक यांचे निर्मलन, सर्वांपर्यंत प्राथमिक शिक्षण पोहचविणे, महिला सक्षमीकरण व स्त्री-पुरूष समानता, बालमृत्युचे प्रमाण कमी करणे, गर्भावस्थेतील महिलांचे आरोग्य सुधारणे, इत्यादींचा उल्लेख करता येतो.

दारिद्र्य, गरिबी ही एक सर्वव्यापी समस्या आहे. जगातील बहूतांश लोक द्रारिद्र्याचे जीवन जगतात. कोणत्याही देशातील दारिद्र्याचे मुख्य कारण साधन संपत्तीचे असमान वितरण हेच असते. भारतात आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या. त्यात प्रामुख्याने मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार करून समाजवादी व्यवस्था प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. यामध्ये कांही प्रमाणात यशही प्राप्त झाले. शतकानुशतके मागास असलेल्या समाज घटकांना कांही प्रमाणात न्याय मिळाला. परंतु देशातील दारिद्र्य किंवा गरिबी हद्दपार झाली असे चित्र अद्यापही दिसून येत नाही. तसेच स्वातंत्र्योत्तर काळात विकासाच्या योजना, प्रकल्प, धोरणे दारिद्र्य निवारणाशी जोडले गेले आहेत. १९७० च्या दशकात पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी `गरिबी हटाव` चा नारा दिला. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण, मनोरंजन या किमान सहा गरजा भागाव्यात म्हणून पंचवार्षिक योजनेत या गरजांच्या पूर्ततेवर भर देण्यात आला. परंतु आजपर्यंत दारिद्र्य निर्मुलन करण्यात भारत यशस्वी झालेला नाही. `मानव विकास निर्देशांकानुसार जगातील सर्वांत जास्त गरिब लोक भारतात आहेत.`

भारताने लोकशाही कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारून सहा दशक व सात वर्षांचा कालखंड पूर्ण झाला आहे. तरी आज भारतात जवळपास २७ कोटी लोक दारिद्र्य रेषेखाली असल्याचे दिसून येतात. त्यांना आपल्या मूलभूत गरजांची पूर्तता करता येत नाही. काहींना तर चोवीस तास फूटपाथवर जीवन व्यतीत करावे लागते. ही जगातील विकसनशील देशासमोरील एक भयान स्वरूपाची समस्या आहे.

**संशोधन पध्दती**

तथ्यसंकलन-प्रस्तूत शोधनिबंध लिहिण्यासाठी दुय्यम साधनसामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे. तथ्य संकलनासाठी संदर्भ ग्रंथ, मासिक, इ-जनरल व वृत्तपत्राचा आधार घेण्यात आला आहे.

**शोध निबंधाचे उद्देश :-**

१) दारिद्र्य निर्मूलन ही संकल्पना स्पष्ट करणे.
२) दारिद्र्य अथवा गरिबीची कारणे शोधणे.
३) दारिद्र्य निर्मूनासाठी प्रशासनाची भूमिका स्पष्ट करणे .
४) दारिद्र्य निर्मूलनासाठी उपाया सूचविणे.

**गृहितकृत्य :-**

१) दारिद्र्य ही मानव निर्मित समस्या आहे.
२) दारिद्र्यातून अनेक सामाजिक समस्या निर्माण होतात.

**दारिद्र्याची संकल्पना :-**

दारिद्र्य ही संकल्पना तशी वेगवेगळ्या दृष्टिकोनातून स्पष्ट करता येते. दारिद्र्यालाच गरिबी असे ही म्हटले जाते. दारिद्र्याचा संबंध हा पैशाशी आहे. ज्याच्याकडे पैशाचा अभाव आहे किंवा जो पौसा उभा करू शकत नाही तो दारिद्री बनतो. पैशाच्या अभावी व्यक्ती आपल्या जिवनाश्यक गरजांची पूर्तता करू शकत नाही त्यास दारिद्र्यात जीवन जगावे लागते. `आपल्या जीवनाचा एक न्युनमत स्तर टिकवून ठेवण्यासाठी व्यक्तीला अन्न, वस्त्र आणि घर या गोष्टी आवश्यक असतात. स्वत: व्यक्ती आणि त्याचावर अवलंबून असणाऱ्या लोकांच्या या आवश्यक गरजांची पूर्तता होत नाही तेंव्हा व्यक्ती आणि त्याचावर अवलंबून असणाज्या लोकांचा जीवनस्तर न्यूनतम जीवन स्तरापेक्षा खाली असतो तेंव्हा त्या अवस्थेस दारिद्र्य असे म्हणतात` अर्थात व्यक्तीच्या आवश्यक गरजांची पूर्तता होत नाही ती अवस्था दारिद्र्याची असते. मायकेल हॅरिंग्टन - ``विशिष्ट समाजातील मूल्ये, विश्वास आणि प्रचलित तंत्रज्ञानाशी मिळत्याजुळत्या अन्न, आरोग्य, निवारा, शिक्षण आणि मनोरंजनापासून वंचित असणे म्हणजे दारिद्र्य होय.``

ज्या लोकांना आपल्या जीवनाश्यक गरजांची पूर्तता करणे शक्य नसते. ज्यांचे उत्पन्न अत्यल्प असते. त्यांचा समावेश दारिद्र्यरेषेखाली केला जातो. `आंतरराष्ट्रीय पातळीवर जीवनमान जगण्याचा संबंध आहारातून मिळणाऱ्या उष्माकांशी जोडला जातो. आहार तज्ञांच्या मते देशातील हवामानाच्या भिन्नतेनूसार वेगवेगळ्या देशात किमान उष्माकांची पातळी वेगवेगळी असते. उदा भारतीय

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta. Sonpeth Dist. Parbhani



[illegible]नात एका व्यक्तीस जीवनमान जगण्यासाठी दररोज किमान २२५० उष्मांकाची गरज असते. यानुसार ``ज्या व्यक्तीला आपल्या मिळणाऱ्या उत्पात्रातून दररोज २२५० उष्मांक मिळवून देईल ऐवढे खाद्यात्र खरेदी करणेही शक्य नसते त्यास दरिद्री मानले जाते.``

दारिद्र्याचे मोजमाप करीत असतांना त्याची तुलना एका देशातील लोकांची दुसऱ्या देशातील लोकांशी करता येत नाही. कारण अमेरिकेतील दरिद्री लोकांचे उत्पन्न भारतातील श्रीमंत समजल्या जाणाऱ्या लोकांपेक्षाही अधिक असल्याचे दिसून येते. त्यामुळे एका देशातील लोकांच्या उत्पन्नाची तुलना दुसऱ्या देशातील लोकांच्या उत्पन्नांशी करणे अव्यवहार्य ठरते.

**भारताच्या संदर्भात दारिद्र्याची संकल्पना :-**

`भारतातही दारिद्र्य संकल्पनेचा संबंध किमान उष्मांकाशी जोडला आहे. भारतीय योजना आयोगाने दारिद्र्य रेषा निश्चित करण्यासाठी एक तज्ञ समिती नियुक्त केली होती. या समितीच्या अहवालानुसार ``एका व्यक्तीस दररोज किमान २२५० उष्माकांची गरज असते. भारतातील ग्रामीण भागात एका व्यक्तीस २४०० उष्माकांची आणि शहरी भागात २१०० उष्माकांची गरज असते. यापेक्षा कमी ज्यांना उष्मांक मिळतात. त्यांना दारिद्र्य रेषेखालील मानण्यात यावे.``

**दारिद्र्य अथवा गरिबीची कारणे :-**

दारिद्र्य अथवा गरिबी वाढण्याचे अनेक कारणे आहेत. सर्वसाधारणपणे दारिद्र्याच्या कारणांचा विचार केला असता व्यक्तिगत, नैसर्गिक, आर्थिक, सामाजिक , धार्मिक व राजकीय कारणे आढळून येतात. खालील प्रमाणे दारिद्र्याच्या कारणांचा आढावा घेता येईल.

**१) व्यक्तिगत कारणे :-**

अनेक विचारवंतांच्या मते दारिद्र्याचे मुख्य कारण व्यक्तिगत आहे. म्हणजेच माणसाची श्रीमंती किंवा गरिबी ही त्यांच्या कर्तत्वावर अवलंबून असते. जो व्यक्ती आपले अस्तित्व निर्माण करण्यासाठी व टिकवून ठेवण्यासाठी सतत संघर्ष व स्पर्धा करतो तो यशस्वी होतो त्याचे जीवनमान उंचावते. याउलट ज्याच्यांकडे जिद्द, चिकाटी इत्यादीचा अभाव असतो ते मागे पडतात. त्यांच्या आर्थिक स्तर खालवतो व त्यांना आपल्या मूलभूत गरजांची पूर्तता करणेही कठीण होते. ते दारिद्र्यात खितपत पडतात. म्हणजेच व्यक्तीने जर आपल्या क्षमता योग्य वापर केला असता तो श्रीमंत बनू शकतो. म्हणून व्यक्तिच्या कर्तत्वावरून श्रीमंती व दारिद्र्य निश्चित होते.

**२) सामाजिक कारणे :-**

सामाजिक कारणामध्ये संयुक्त कुटूंब पध्दती, जाती व्यवस्था, सामाजिक रूढी, परंपरा, गलिच्छ वस्ती, अज्ञान इ. कारणांचा समावेश होतो. संयुक्त कुटूंब पध्दतीमध्ये कांही व्यक्ती निष्क्रीय बनतात. कारण त्यांच्या गरजा कोणतेही काम न करता पूर्ण होतात. समाजातील जाती व्यवस्थेमुळे व्यक्तीच्या व्यवसायावर बंधने येतात. त्यांच्या आवडीचे काम करता येत नसल्यामुळे कामामध्ये उत्साह राहत नाही. सामाजिक रूढी परंपरानुसार हे करावे हे करू नये अशी बंधने असतात. त्यामुळे व्यक्तीच्या मानसिकतेवर परिणाम होते व व्यक्ती निष्क्रिय बनते. अज्ञानामुळेही व्यक्तीला आपण काय करायला पाहिजे याविषयी निर्णय घेता येत नाही. अशा व्यक्ती दारिद्री असतात.

**३) शिक्षणाचे अल्प प्रमाण :-**

भारताच्या साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे. परंतु केवळ लिहिता वाचता येणे एवढ्यापुरती साक्षरता मर्यादित असेल तर शिक्षणाचा उद्देश साध्य होणार नाही.शिक्षण हे व्यक्तीला स्वतःच्या पायावर उभे करणारे, आर्थिक विकासात साहाय्यक ठरणारे असावे लागते. अशा परिपूर्ण शिक्षणाचे प्रमाण भारतात फारच कमी प्रमाणात मिळते. त्यामुळे दारिद्र्याची समस्या तीव्र स्वरूपाची होते.

**४) व्यावसायिक कौशल्याचा अभाव :-**

भारतीय जनतेला योग्य शिक्षणा बरोबरच व्यवसायिक कौशल्याचे शिक्षण मिळत नाही. व्यवसायिक कौशल्याच्या अभावी रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाही. जरी रोजगार मिळाला तरी श्रम जास्त व मजुरी कमी अशा प्रमाणात मिळतात. त्यामुळे त्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यास मदत होत नाही. परिणामी त्यांना दारिद्र्याचे जीवन जगावे लागते.

**५) व्यसनाधीनता :-**

भारतीय ग्रामीण व नागरी समाजात व्यसनाधीन लोकांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते. तसेच ज्या व्यक्ती दारिद्र्याने ग्रस्त आहेत अशा व्यक्तीमध्ये व्यसनाचे प्रमाण अधिक आहे. व्यसनामुळे त्यांच्या क्रयशक्तीवर परिणाम होतो. अनेकदा त्यांच्या कामाचा वेळ व्यसनामध्ये निघून जातो. अशा व्यक्ती अतिदारिद्री बनतात. त्यांच्या कुटूंबीयांना अत्यंत हालाखिचे जीवन जगावे लागते. अशा कुटूंबातील मुलांवरही वाईट संस्कार होतात. यामुळे या कुटूंबामध्ये पिढ्यान पिढ्या दारिद्र्याचा वास राहतो.

**६) दारिद्र्याची उपसंस्कृती :-**

दारिद्र्याची संस्कृती ही संकल्पना १९५९ साली ऑस्करलेवीस यांनी लोकप्रिय केली. तो म्हणतो, दारिद्र्याची एक जीवनपध्दती असते. ती एक प्रकारची संस्कृती असते, कारण दारिद्री वर्गात ज्या लोकांचा समावेश झालेला असतो. त्यांची स्वतःची इतरांपेक्षा काही खास मूल्ये, श्रध्दा नि नियमने असतात. त्यांची गरिबी कमी करण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले तरी त्यांची संस्कृती प्रयत्नाच्या

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani



असते. त्यांचे स्वत:चे जे एक दारिद्र्याबद्दलचे तत्वज्ञान असते तेच त्यांच्या आर्थिक प्रगतीला विरोध करीत असते. म्हणूनच हे लोक दारिद्र्यातही समाधान मानत असतात.`

**७) वाढती लोकसंख्या :-**

वाढत्या लोकसंख्येमुळे दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येत बरीच वाढ झालेली आढळून येते. वाढत्या लोकसंख्येच्या मानाने देशातील अन्नधान्याचे उत्पादन कमी पडते. त्यामुळे अन्नधान्यांचा प्रश्न निर्माण होतो. पुरवठा कमी व मागणी जास्त यामुळे किंमती वाढतात. तसेच वाढत्या लोकसंख्येमुळे बेरोजगारीची समस्या निर्माण होते. वाढती लोकसंख्या ही देशाच्या आर्थिक विकासातील एक फार मोठी समस्या ठरली आहे. सतत लोकसंख्येत होणाऱ्या वृध्दीमुळे देशात घडून आलेली प्रगती दिसून येत नाही. लोकसंख्या वाढीमुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. तसेच दारिद्र्याच्या वाढीचे कारण लोकसंख्या वाढ असल्याचे स्पष्ट होते.

**८) राजकीय कारणे :-**

राजकीय परिस्थितीचा फार मोठा प्रभाव देशाच्या विकासावर पडतो. भारतात दारिद्र्याची समस्या मोठ्या प्रमाणावर निर्माण होण्यास येथील राजकारण प्रामुख्याने जबाबदार आहे. राजकारणी लोक गरिब लोकांचा सत्तेसाठी वापर करून घेतात. गरिबांना काही आर्थिक प्रलोभणे दाखवून सत्ता मिळविणारे राजकारणी स्थानिक स्तरापासून ते राष्ट्रीय स्तरापर्यंत आढळून येतात. अलीकडे तर `नोट के बदले वोट` अशी व्यवस्था निर्माण झालेली आढळून येत आहे.

वास्तविकता दारिद्र्य निर्मूलानासाठी नियोजन करणे हे शासनाचे कर्तव्य असते. त्याच बरोबर, शासनाच्या चुकीच्या निमर्णयामुळे लालफीशाहीमुळे, योजनांची अमंलबजावणी न झाल्या कारणाने दारिद्र्यांची मात्रा वाढत जाते. मंदीच्या काळात बेकारांना आर्थिक सुरक्षा प्रदान न केल्या कारणाने त्यांची क्रयशक्ती क्षीण होते. थोडक्यात दारिद्र्य निर्मुलनाविषयी राज्यकर्त्यांची मानसिकता अनुकूल राहत नाही. त्यामुळे दारिद्र्यात वाढ होते.

**९) न्यून विकासाचा दर :-**

दारिद्र्य वाढीचे महत्वाचे कारण म्हणजे आर्थिक विकारसाचा वेग कमी असणे हे आहे. `१९८१ या काळात भारतातील वृध्दिदर सरासरीने ३.५% होता. १९८१ ते १९९१ या काळात तो ५% पर्यंत वाढला. १९९१ नंतर आर्थिक सुधारणा काळात वृध्दिदर सरासरीने ५.५% आहे. लोकसंख्या वाढीच्या वेगाच्या मानाने आर्थिक - वृध्दिदर कमी असल्याने भारतात दारिद्र्य टिकून आहे.`

**१०) उत्पन्न विभाजनातील विषमता :-**

`साधन संपत्तीच्या मालकी हक्कामुळे भारतात राष्ट्रीय उत्पन्नाचे विभाजन खूपच असमान झाले आहे. १९९१-९२ च्या रिझर्व्ह बँकेच्या पाहणीनुसार भारतातील २०% अति गरीब लोकांना राष्ट्रीय उत्पन्नाच्या फक्त ८% हिस्सा मिळतो. तर १०% श्रीमंत लोकांना राष्ट्रीय उत्पन्नाचा ३०% वाटा मिळतो. ग्रामीण क्षेत्रापेक्षा शहरी क्षेत्रात आर्थिक विषमता जास्त आहे. आर्थिक विषमता हेच दारिद्र्याचे मूळ कारण आहे. सापेक्ष दारिद्र्य संकल्पनेनूसार मुठभर श्रीमंताच्या उत्पन्नाची आणि उपभोग खर्चाची गरीब वर्गाच्या उत्पन्नाशी आणि उपभोग खर्चाशी तुलना करता भारतात दारिद्र्याचे प्रमाण बरेच मोठे आहे.`

**११) अपर्याप्त हस्तांतरण :-**

शेतकऱ्यांच्या उत्पन्नात स्थैर्य निर्माण करण्यासाठी सरकारीने कृषि उत्पदनासाठी आधार किंमतीचे धोरण आंगिकारले, कृषि उत्पादनात वाढ करण्यासाठी रासायनिक खते, किटकनाशके, कृषि अवजारे उत्पादित करणाऱ्या उद्योग संस्थांना सरकार मार्फत अनुदान दिले जाते. कृषि क्षेत्रास वीज आणि इंधनाचा पुरवठा सवलतीच्या दरात केला जातो. औद्योगिक क्षेत्रातील कांही उद्योगांनाही अनुदान दिले जाते. परंतु दुर्देवाने आर्थिक साहाय्याचा आणि अनुदानाचा लाभ गरीब वर्गाला होत नाही. जर बडे शेतकरी, उद्योजक, व्यापारी अशा धनिक लोकांनाच जास्त होतो. आणि गरीब लोक यापसून वंचित रहात व अधिकच गरीब बनतात.

भारतातील दारिद्र्याची वरिल विविध कारणे दिसून येतात. या दारिद्र्याचे भारतीयांच्या जीवनमानावर घातक असे परिणाम झोलेल दिसून येत आहेत. भारत हा विकसनशील देश म्हणून ओळखला जातो. जगातील दुसरी झपाट्याने विकसित होणारी अर्थव्यवस्था म्हणून भारताकडे बघितले जात असतानाच दुसरीकडे दारिद्र्य निर्मूलनाच्या दृष्टीने आपली कुवत काय आहे हे जागतिक आकडेवारीने समोर आणले आहे.

`भारताच्या दृष्टीने अतिशय गंभीर बाब म्हणजे जगातील तीन कुपोषित बालकांपैकी एक बालक भारतीय असून एकूण भारतीय बालकांपैकी ४२ टक्के बालके ही कुपोषणाची शिकार आहेत. हे युनिसेफच्या अहवालातून समोर आले आहे. त्यामध्ये असेही म्हटले की, भारतातील अर्ध्याहून अधिक गरोदर महिला ॲनिमिक असतात. त्यामुळे त्यांच्या दुर्बल शरीराला बाळाला सुदृढ आणि सुडोलता देण्याची शक्ती कशी येणार? थोडक्यात दारिद्र्य-भूक-कुपोषण-ॲनिमिया आणि पुन्हा कुपोषित बाळ अशी ही दुर्देवाची मालिका गरीब घरात पाहावयास मिळते.`

**दारिद्र्य निर्मूलनात प्रशासनाची भूमिका :-**

शासनाद्वारे दारिद्र्य निर्मुलनासाठी विविध योजना राबविण्यात आल्या जसे एकीकृत ग्रामीण विकास कार्यक्रम, रोजगारवाढीसाठी

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani



योजना, स्वर्णजयंती रोजगार योजना, प्रधानमंत्री रोजगार योजना, पंचावार्षिक योजना, उद्योगांचे राष्ट्रीयीकरण, वीस कलमी कार्यक्रम जवाहर हमी योजना, अन्नसुरक्षा कार्यक्रम, राजीव गांधी जीवनदायी योजना, गरीबी हटाव कार्यक्रम, बेकारी निर्मूलन कार्यक्रम राबवून दारिद्र्य निर्मूलनाचा प्रयत्न केंद्र व राज्य सरकारद्वारे करण्यात आला. शासनाद्वारे निश्चित केलेल्या धारेणांची अमंलबजावणी करण्याची भूमिका प्रशासनाची असते. या धोरणांची प्रभावी अमंलबजावणी करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणाही तेवढीच प्रभावी असावी लागते. तसेच राज्यकर्ते व सनदी सेवक यांच्यात योग्य तो समन्वय असावा लागतो.

प्रशासकीय यंत्रणेतील अधिकारी आणि कर्मचारी यांची भूमिका दारिद्र्य निर्मूलनात महत्वाची आहे. कारण हे अधिकारी व कर्मचारीच प्रत्यक्ष त्या व्यक्तीला लाभ मिळवून देण्यासाठी कार्य करीत असतात. प्रशासनाने दारिद्र्य निर्मूलनाच्या योजना राबवत असतांना अयोग्य व्यक्तीला लाभ मिळणार याची दखल घेतली पाहिजे. कारण भारतीय व्यवस्थेत राज्यकर्ते प्रत्येक कार्यक्रमात हस्तक्षेप करून त्या योजनेचे लाभ आपल्या कार्यकर्त्यांना मिळवून देण्याचा प्रयत्न करतात. तेव्हा प्रशासकीय अधिकाऱ्याने सर्व नियमांचे पालन करून संबंधित व्यक्तीला त्या योजनेचा फायदा मिळेल यासाठी प्रयत्नशील असणे अवश्यक असते. परंतु भारतीय प्रशासन व्यवस्थेवर राज्यकर्त्यांचा प्रभाव अधिक असतो. राज्यकर्त्यांद्वारे प्रशासकीय अधिकाऱ्यांवर वेळोवेळी दबाव आणला जातो. यामुळे लाभार्थी बाजूला राहून श्रीमंत लोकच या योजनेचा फायदा घेताना दिसून येतात. भारतीय प्रशासन व्यवस्थेतील लालफित आणि भ्रष्टाचारामुळे अनेक योजनांची योग्य पध्दतीने अमंलबजावणी झालेली नाही असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. वास्तविक पाहता दारिद्र्य निर्मुलनासाठीच्या योजना राबवित असतांना प्रशासनाने ते अधिक जबाबदारीने व प्रमाणिकपणाने राबिल्या पाहिजेत. परंतु मानवी समाजात कोणतेही कार्य करीत असतांना व्यक्ती प्रथमत: आपला स्वार्थ पाहत असतो. प्रशासनातील अधिकारी व कर्मचारीही याला अपवाद नाहीत.

थोडक्यात शासनाच्या कोणत्याही योजनाचे यश हे प्रशासनावर अवंलंबून असते. दारिद्र्य निर्मलनासारख्या योजनांची प्रभावी अमंलबजावणी करण्याच्या दृष्टीने निष्ठवान प्रामाणिक, जनसेवेची जान, असणारे अधिकारी प्रशासनात असणे आवश्यक असते.

`देशाच्या विकास प्रक्रियेचा आढवा घेताना डॉ.द.बा.धनागरे म्हणतात.` `शासनाच्या गंगाजळीतून कल्याणकारी योजनांवर व दारिद्र्य निर्मुलनासाठी अमाप निधी खर्च होत असताना त्याची फलश्रूती मात्र उत्साहवर्धक नाही.``१० याचे प्रमुख कारण म्हणजे राज्यकर्त्यांकडे इच्छाशक्तीचा अभाव व प्रशासकीय यंत्रणेतील दिरंगाई व भ्रष्टाचार आहे असे म्हटले तर ते चूकीचे ठरणार नाही.

**· दारिद्र्य निर्मूलनासाठी शिफारशी :-**

१. प्रत्येक व्यक्तीने आपल्या क्षमतांचा पूर्ण वापर केला पाहिजे. यामुळे त्याचा आर्थिक स्तर उंचवतो.

२. शासनाने लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी जनजागृतीच्या दृष्टीने अधिक प्रयत्न केले पाहिजेत. राजकारण करू नये.

३. दारिद्र्य निर्मूलनाच्या योजनांचा लाभ संबंधितांना मिळावा यासाठी योजनांची माहिती दारिद्र्यरेषेखालील लोकांना योग्य पध्दतीने दिली पाहिजे.

४. प्रशासकीय यंत्रणा सक्रीय ठेवण्यासाठी प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना मानिसकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी विशेष प्रशिक्षण असावे. त्यांच्यामध्ये लोकहिताची, समाजसेवेची भावना मोठ्या प्रमाणात उत्पन्न करावी.

५. प्रशासनातील कर्मचाऱ्यांची संख्या पर्याप्त असावी.

६. शाळेतून व महाविद्यालयातून देण्यात येणाऱ्या शिक्षणाला व्यवसायिक शिक्षणाची जोड देण्यात यावी म्हणजे औद्योगिक क्षेत्रासाठी कुशल कर्मचारी मिळतील व बेकारीचे प्रमाण कमी होऊ दारिद्र्य निर्मूलन करण्यास मदत होईल.

**गृहितकृत्याची पडताळणी :-**

प्रस्तूत शोधनिबंधासाठी `दारिद्र्य ही मानव निर्मित समस्या आहे.` हे पहिले गृहितकृत्य निश्चित करण्यात आले होते. ते शोधनिबंधाच्या विश्लेषणातून सिध्द होते. कारण मानवाचा आळसी स्वभाव व्यवसनाधिनता यामुळे दारिद्र्याची स्थिती येते हे स्पष्ट होते. दुसरे गृहितकृत्य `दारिद्र्यातून अनेक समस्या निर्माण होतात.` हे गृहितकृत्य ही या शोधनिबंधाद्वारे सिध्द होते. दारिद्र्यामुळे कुपोषण, महिला आरोग्य, भिकारी, भुकबळी, गुन्हेगारी, बालमजुरी अशा सामाजिक समस्या निर्माण होतात. म्हणून हे गृहितकृत्य सत्य सिध्द होते.

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत शोध निबंधाद्वारे खालील निष्कर्ष काढता येतात.

१. दारिद्र्य ही स्थिती मानव निर्मित असून साधन संपत्तीच्या असमान वाटपामुळे कांही लोक दारिद्र्याचे जीवन जगत असतात.

२. दारिद्र्य हे मानवाच्या निष्क्रीयेमुळे येते.

३. भारतात काही लोक एवढी अज्ञानी आहेत की, दारिद्र्यात जीवन जगण्यात ते समाधानी असतात.

४. ज्या लोकांकडे धनसंपत्ती आहे असे लोक अधिक धनसंपत्ती मिळविण्यासाठी गरिब लोकांचे आर्थिक शोषण करतात. यामुळे गरीब अधिक गरीब तर श्रीमंत अधिक श्रीमंत होतात.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Dist. Parbhani

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 | Vidyawarta™ | Apr. To June 2017 Issue-18, Vol-03 | 0112

**सारांश :-**

भारतामध्ये स्वातंत्र्यापासूनच दारिद्र्य निर्मूलनासाठी वेगवेगळ्या योजना आखण्यात आल्या व राबविण्यात आल्या परंतु आपेक्षित यश मिळाले नाही. मोदी सरकारने दारिद्र्य निर्मूलनासाठी `युनिव्हर्सल बेसिक इन्कम` या संकल्पनेचा स्वीकार केला आहे. या अंतर्गत देशातल्या प्रत्येक नागरिकाला किमान उत्पान्नाची हमी देण्यात येते. नागरिकांना हाताला काम असो की नसो प्रत्येकाला उत्पन्नाची हमी सरकारतर्फे देण्यात येते. अशा कांही बाबी या संकल्पनेत येतात. परंतु यामुळे दारिद्र्य निर्मूलन होईल किंवा नाही हे सागता येत नाही. मात्र धोका मात्र संभावतो आहे. लोकांना जर काम न करता उत्पान्नाची हमी मिळत असेल तर लोक निष्क्रिय बनतील ऐतखाऊ बनतील श्रमाला महत्व राहणार नाही. त्यामुळे दारिद्र्य निर्मूलन करीत असतांना लोकांच्या हाताला काम देणे व त्यांचा आर्थिक स्तर उंचावणे अत्यावश्यक करते. यामुळे सामाजिक आरोग्य टिकून राहण्यास मदत मिळते.

**संदर्भ सूची**


१. प्रा.अशोक गोरे-भारतीय सामाजिक समस्या, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१५ पृ.क्र. २३३
२. डॉ.प्रदीप आगलावे- आधुनिक भारतातील सामाजिक समस्या, विद्या प्रकाशन, नागपूर ऑगस्ट २००१ पृ.क्र. १८१
३. डॉ.दा.धो.काचोळे - भारताच्या विघटनात्मक समस्या, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, १९९८ पृ.क्र. ४२५
४. प्रा.एन.एल. चव्हाण - भारतीय अर्थव्यवस्था, प्रशांत पब्लिकेशन, पुणे २०१३ पृ.क्र. ६६
५. उपरोक्त पृ.क्र.६७
६. डॉ.दा.धो.काचोळे - भारताच्या विघटनात्मक समस्या, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, १९९८ पृ.क्र. ४३१
७. प्रा.एन.एल. चव्हाण - भारतीय अर्थव्यवस्था, प्रशांत पब्लिकेशन, पुणे २०१३ पृ.क्र. ७३
८. उपरोक्त पृ.क्र. ७३
९. Socio - Economic Growth of BPL Classes : Issues & Challenges, Edited by Dr. Satpute V.D.- प्रा.डॉ.धैर्यशील सोळुंके - भारतातील दारिद्र्य : कारणे, परिणाम आणि उपाय योजना, न्यूमन पब्लिकेशन २०१४ पृ.क्र. ४४८
१०. प्रा. अशोक गोरे - भारतीय सामाजिक समस्या, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद २०१५ पृ.क्र. २३८


❑❑❑

**25**

# स्त्री शिक्षणाचा ऐतिहासिक आढावा

रविंद्र पाटील

**प्राचीन काळ-**

प्राचीन भारतात स्त्रियांना मानाचे स्थान होते. स्त्री-पुरुषांना समान शैक्षणिक सोयी-सुविधा उपलब्ध होत्या. शिक्षणाचे प्रारंभी होणारे 'उपनयन' संस्कार मुलांप्रमाणे मुलींचेही झाल्याचे ऐतिहासिक दाखले आहेत. मैत्रयी, गार्गी सारख्या स्त्रिया पुरुषांइतक्याच शिकल्या होत्या याचे पुरावे सापडतात.

**मध्ययुगीन काळ-**

या काळात राजकीय, आर्थिक, सामाजिक परिवर्तने घडून आली आणि स्त्रियांचा समाजातील दर्जा घसरला. त्यांना पुरुषाप्रमाणे संधी मिळेनाशा झाल्या. स्त्री शिक्षणासंबंधी काही ग्रह रुढ झाले. मुलगी शिकली तर ती विधवा होईल असा समज रुढ झाला. ब्रिटीश भारतात आले तेव्हा भारतातील स्त्री शिक्षण जवळजवळ नाहिसे झाले होते.

**ब्रिटीश काळ-**

ब्रिटीश काळात आद्यौगिकरणाकडे थोडी वाटचाल सुरु झाली. या बदलाचे प्रतिबिंब शिक्षणात दिसू लागले. स्त्रीयांच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न १९व्या शतकात महात्मा फुले आणि २०व्या शतकाच्या प्रारंभापासून महषण्ड्र कर्वे यांनी केले.

**महात्मा फुले-**

१८५१ साली महाराष्ट्रातील सर्व स्तरांतील मुलींना मातृभाषेतून शिक्षण देण्यासाठी पुण्यात पहिली मुलींची शाळा काढली. अशी शाळा काढणारे म. फुले हे पहिले भारतीय होत. समाजाच्या तळागाळात शिक्षणाची सुरुवात व्हायला पाहिजे हा साधा सरळ विचार (शिक्षण झिरपत जाईल या विचाराविरुध्द) म.फुले यांचा होता. फुलेकालीन स्त्रीजीवन हे



PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani